महाराष्ट्र शासन
शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, धाराशिव
GOVERNMENT MEDICAL COLLEGE & HOSPITAL, DHARASHIV
कोविड-१९ इमारत, जिल्हा रुग्णालय आवार, धाराशिव. (महाराष्ट्र) ४१३ ५०१
e-mail: deangmcosmanabad@gmail.com

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

जा.क्र. शावैमवरुधा/आस्था-२,३/ 1229 /२०२४ दि.05/08/२०२४

# जाहिरात

विषय :- महात्मा ज्योतीबा फुले जन आरोग्य योजनांतर्गत खालील पदे निव्वळ कंत्राटी पध्दतीवर एकत्रित मानधनावर तात्पुरत्या स्वरुपात ११ महिन्याकरिता मुलाखतीद्वारे पदे भरणे बाबत.

संदर्भ :-१. मा. आयुक्त, (वै.शि.), वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई यांनी दिनांक ६.०७.२०२२ व दि. ७.७.२०२२ रोजी व्हिडीओ कॉन्फरन्समध्ये दिलेले निर्देश.

२. या कार्यालयाचे आदेश क्र.

३. निवासी वैद्यकीय अधिकारी, बाहयरुग्ण विभाग, यांचे पत्र क्र. वैमरु/बारुवि/५३४/२०२२ दि. १५.०९.२०२२.

अधिष्ठाता, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, धाराशिव. या संस्थेत महात्मा ज्योतीबा फुले जन आरोग्य योजनांतर्गत रुग्ण नोंदणीच्या कामासाठी थेट मुलाखतीद्वारे खालील तक्त्यात नमुद केलेली पदे कंत्राटी पदध्दतीने पात्र उमेदवाराकडून अर्ज मागवण्यात येत आहे.

| अ.क्र. | पदनाम | शैक्षणीक पात्रता | एकुण संख्या | वयोमर्यादा | अनुभव | रक्कम दरमहा एकत्रित मानधन |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | Medical Co-ordinator (Medical officer) | Minimum M.B.B.S. | ०१ | ३८ खुला प्रवर्ग ४३ मागास प्रवर्ग | कमीत कमी ०३ वर्ष पुर्ण वेळ विषयास अनुसरुन कामाचा अनुभव. | Rs. ४००००/- (If MBBS) & Rs ३०००० to ३५०००/- (Non MBBS) |
| २ | Medical Camp Co-ordinator (Non Medical) | MSW/ Graduate/ B.A.M.S./BHMS | ०१ | | | २०००० ते २५०००/- |
| ३ | Billing Clerk | Any Graduate With Experience of Accounts | ०१ | किमान वयोमर्यादा १८ वर्ष व कमाल वयोमर्यादा ३८ वर्ष. | कमीत कमी ०३ वर्ष पुर्ण वेळ विषयास अनुसरुन कामाचा अनुभव. | १००००/- प्रत्येकी (एकत्रित दहा हजार रुपये मानधन) |
| ४ | डाटा एन्ट्री ऑपरेटर | १) विज्ञान विषयात पदवी परीक्षा आणि या परीक्षेस समकक्ष म्हणुन घोषीत केलेल्या इतर परीक्षा उत्तीर्ण झालेले उमेदवार<br>२) एम. एस. सी. आय. टी. परीक्षा उत्तीर्ण उमेदवार.<br>३) मराठी टंकलेखन वेग किमान ३० श.प्र.मि. आणि इंग्रजी टंकलेखन वेग किमान ४० श.प्र.मि. या अर्हतेचे शासकीय वाणिज्य प्रमाणपत्राचे अथवा या उद्देशासाठी समकक्ष म्हणुन घोषीत केले आहे असे अन्य कोणतेही संस्थेने दिलेले प्रमाणपत्र धारण करीत असलेला उमेदवार.<br>४) उच्चशिक्षित व सदरील कामाचा अनुभव असलेल्या उमेदवारास प्राधान्य दिले जाईल. | ०५ | | | |

**सर्वसाधारण अटी व शर्ती:-**

१) वरील पदाच्या संख्येत कमी/जास्त करण्याचे अधिकार मा. अधिष्ठाता यांनी राखुन ठेवले आहेत.

२) सर्व पदे निव्वळ कंत्राटी व तात्पुरत्या स्वरुपाची असुन ती राज्यशासनाकडील पदे नाहीत.

३) ज्या उमेदवारचे अर्ज विहीत दिनांक व वेळेस प्राप्त होतील केवळ अशाच उमेदवारचे अर्ज विचारात घेतले जातील.

४) मुलाखतीस पदसंख्येप्रमाणे अर्जाचीछाननी करुन पात्र उमेदवारांना मुलाखतीस बोलविण्यात येईल व मुलाखतीस प्रात्र उमेदवारांची यादी या संस्थेच्या वेबसाईट व नोटीसबोर्डावर लावण्यात येईल.

५) विषयातील कार्यानुभव असणाऱ्या उमेदवारांना प्राध्यान्य देण्यात येईल.

**विशेष सुचना:-**

१) नियुक्त झालेल्या उमेदवारांना नियुक्ती आदेश ११ महिन्याकरिता किंवा शासनाच्या ठरलेल्या धोरणास अनुसरुन देण्यात येईल.

२) प्रशासकीय किंवा अन्य कारणास्तव निवड भरती प्रक्रिया कोणत्याही वेळेस किंवा कोणत्याही टप्यावर थांबविण्याचे अधिकार मा. अधिष्ठाता, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, धाराशिव यांनी राखुन ठेवले आहेत.

३) निवड झालेल्या उमेदवारांना निव्वळ तात्पुरत्या कंत्राटी (करार) तत्वावर नियुक्त्या देण्यात येत असल्याने त्या कधीही व केव्हाही कमी करण्यात येतील. त्यावर उमेदवारास कोणताही कायम स्वरूपाचा हक्क सांगता येणार नाही.

४) डाटा एन्ट्री ऑपरेटर या पदाचे वेतन एकत्रित स्वरुपातील(कंत्राटी वेतन) असल्यामुळे इतर कोणतेही भत्ते अनुज्ञेय राहणार नाहीत.

५) डाटा एन्ट्री ऑपरेटर या पदासाठी निवड झालेल्या उमेदवारास वैद्यकीय दृष्टया सक्षम असल्याबाबतचे प्रमाणपत्र सादर करणे बंधनकारक राहील.

६) अर्ज कोऱ्या कागदावर व अर्जामध्ये (अ) अर्ज करत आहेत त्या पदाचे नाव (ब) पुर्ण पत्ता, मोबाईल, नंबर, ई-मेल आयडी (क) जन्म दिनांक (शालांत प्रमाणपत्रावरील) (ड) शैक्षणिक अर्हता, गुण, टक्केवारीसह (इ) कामाचा अनुभव पदनिहाय वर्ष/महिने / दिवस इ. माहिती अर्जात नमुद करावी अर्जासोबत पासपोर्ट आकाराचे दोन फोटो, काम केल्याचा अनुभव प्रमाणपत्राच्या साक्षांकित प्रती यासह भरलेला अर्ज जाहिरात प्रसिध्द झाल्याच्या दिनांक ०५/०८/२०२४ ते दिनांक १५/०८/ २०२४ पर्यत सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत अधिष्ठाता, यांच्या कार्यालयातील रुग्णालय विभागातील आवक विभागात सादर करावा.

मुलाखतीस पात्र उमेदवाराची यादी प्रसिध्द करण्याचा दिनांक:-१९/०८/२०२४.

मुलाखतीचा दिनांक व वेळ :- २६/०८/२०२४. सकाळी ११.०० वाजता.

मुलाखतीचे ठिकाण:- अधिष्ठाता यांचे कार्यालय, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, धाराशिव.

शासकीय वैद्यकिय महाविद्यालय व रुग्णालय • धाराशिव •

अधिष्ठाता,
(डॉ. शिल्पा व. दोमकुंडवार)
शासकीय वैद्यकीय महाविद्यालय
व रुग्णालय, धाराशिव.
अधिष्ठाता,
शासकीय वैद्यकिय महाविद्यालय व
रुग्णालय,धाराशिव

प्रति,

१) सुचनाफलक (अधिष्ठाता कार्यालय), शा.वै.म., धाराशिव.

२) सुचनाफलक (वैद्यकीय अधिक्षक कार्यालय), शा. वै. म. व रु., धाराशिव.

३) अधिष्ठाता, शा. वै. म. व रु. धाराशिव वेबसाईट: https://www.gmcosmanabad.org.